# पदभरती जाहिरात

## जिल्हा सामान्य रुग्णालय नांदेड

**कंत्राटी पद्धतीने खालील नमूद पदांकरिता दि २१-८-२०२० पर्यंत *अर्ज मागविण्यात येत आहेत.***

कोविड-१९ अंतर्गत खालील पदाची नांदेड महानगर पालिका व जिल्हा कार्यक्षेत्र CCC, DCHC व DCH येथे कोरोना (कोविड -१९) साठीचा संसर्गजन्य आजार नियंत्रणात येईपर्यंत, बाँड पूर्ण न झालेले व इतर परंतु आरोग्य सेवा देण्यास सक्षम असणाऱ्या उमेदवारांची कंत्राटी पदे आवश्यकतेनुसार भरावयाची आहेत. त्यानुसार इच्छुक उमेदवारांनी **http://nanded.nic.in** या संकेत स्थळावर सदर जाहिरात पाहून त्याप्रमाणे त्यामध्ये देण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये आणि सर्व आवश्यक शैक्षणिक अर्हता, जन्मतारीख दाखला, तसेच संबंधित परिषदेची अद्यावत नोंदणी असल्याचे प्रमाणपत्रासह दररोज दु.१२.०० पर्यंत जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या आवक जावक शाखेकडे सादर करावेत.

| पदनाम | शैक्षणिक अर्हता | कमाल वयोमर्यादा | पदसंख्या | वेतन दरमहा |
|---|---|---|---|---|
| **Lab technician** | **B.Sc, DMLT/ 10+2 with diploma in Relevent Field** | **खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष तथा आरक्षित प्रवर्गासाठी ४३ वर्ष** | ३५ | १७०००/- |

**<u>अटी व शर्ती –</u>**

१) इच्छुक उमेदवारांनी देण्यात आलेल्या अर्जाच्या नमुन्यामध्ये अर्ज करून सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे १) वयाचा दाखला २) पदवी/ पदविका च्या शेवटच्या वर्षाची एकत्रित टक्केवारी दर्शविणारी गुणपत्रिका सादर करावी (सर्व वर्षांच्या गुणपत्रिका जोडण्यात येऊ नयेत) ३) पदवी प्रमाणपत्र ४) संबंधित परिषदेची अद्यावत नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र ५) शासकीय/ निमशासकीय/ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे स्पष्टपणे आणि दिसण्यासारख्या स्वरुपात दररोज दु १२.०० वाजेपर्यंत जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या कार्यालयातील आवक जावक विभागाकडे सादर करावेत.

२) सदर नियुक्ती ही कंत्राटी स्वरुपाची असून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आहे व कोरोना साथ संपेपर्यतच किंवा नियुक्ती प्राधिकारी ठरवतील तो पर्यंत सदर नियुक्त्या अस्तित्वात राहतील.

३) प्राप्त झालेल्या अर्जावरून Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक गुण +शासकीय व निमशासकीय कार्यालयातील संबंधित पदाच्या अनुभवाच्या गुणावरून मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल आणि पदांच्या आवश्यकतेनुसार संबंधित पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.

४) उमेदवारांनी काम करण्यास इच्छुक असलेल्या महानगर पालिका क्षेत्र / तालुक्याचे नाव अर्जमध्ये नमूद करणे अनिवार्य असून त्याच तालुक्यातील आवश्यक त्या रिक्त पदानुसार उमेदवारांना त्याच तालुक्यात नियुक्ती देण्यात येईल. इतर तालुक्यामध्ये जाण्याबाबत उमेदवाराने इच्छा दर्शविल्यास त्यास इतर तालुक्यामध्येही पदस्थापना देण्याबाबत विचार करण्यात येईल.

५) वरील सर्व पदे कंत्राटी स्वरुपाची व एकत्रित मानधनाची असून COVID-१९ या साथरोगाच्या कालावधी पुरतीच असल्याने, साथ कमी झाल्यास किंवा रुग्णालयातील COVID-१९ उपचार केंद्रे बंद झाल्यास किंवा कृती आराखड्यामध्ये पदांना मंजुरी न मिळाल्यास सदरील नेमणूक कोणतीही पूर्व सूचना न देता आपोआप सेवा समाप्त करण्यात येईल.

६) अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा.

७) सदर पदे करार पद्धतीने भरावयाचे असल्याने सदर पदांवर शासकीय सेवेप्रमाणे असलेले कोणतेही नियम, अट व शर्थी याबाबतचा हक्क व दावा राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाहीत तसेच एकत्रित मानधनाशिवाय अन्य कोणताही भत्ता लागू राहणार नाही.

**टिप :- B.Sc अर्हताधारक उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.**

सदस्य सचिव, निवड समिती
तथा जिल्हा शल्य चिकित्सक,
नांदेड

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

जिल्हास्तरीय निवड समिती, व्दारा जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय, नांदेड

कोविड १९ अंतर्गत कंत्राटी पद्धतीने जाहिरातीतील पदासाठी करावयाचा अर्जाचा नमुना

अर्ज केलेल्या पदाचे नाव :- ----------------------------------------------------------------

काम करण्यास इच्छुक असलेल्या
महानगर पालिका कार्यक्षेत्राचे
किंवा तालक्याचे नाव :-----------------------------------------------------------------

येथे स्वतःचा फोटो लावावा

१)उमेदवाराचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) :-

२)जन्मतारीख :- अर्जाच्या दिनांकास वय:-

(दिनांक) (महिना) (वर्ष)

३)शैक्षणीक अर्हता :- उत्तीर्ण केलेल्या महाविद्यालयाचे नाव :-

४)परिक्षेतील गुण खालीलप्रमाणे –

| वर्ष | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्रयत्न संख्या | पैकी गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| आवश्यक शैक्षणिक अर्हतेच्या अंतिम वर्षाचे गुण | | | | | |

७) शासकीय / निमशासकीय काम केल्याचा अनुभव असल्यास त्याचा तपशील

| अ.क्र. | काम केलेल्या कार्यालयाचे नाव | पद | एकूण कालावधी | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

५) तात्पुरत्या पत्रव्यवहाराचा पत्ता, संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी :-

६) कायमचा पत्ता :-

वर नमुद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचुक आहे. मी प्रमाणित करतो/करते कि, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या इतर कार्यवाहीस पात्र व बांधील राहीन.

**दिनांकः-** / /२०२०

**ठिकाणः-** **नांदेड**

उमेदवाराची स्वाक्षरी
(उमेदवाराचे संपूर्ण नाव)

**खालील प्रमाणपत्रे साक्षांकित करून अर्जासोबत जोडलेले आहेत.**

१) वयाचा दाखला

२) पदवी/ पदविका च्या शेवटच्या वर्षाची एकत्रित टक्केवारी दर्शविणारी गुणपत्रिका

३) पदवी प्रमाणपत्र

४) संबंधित परिषदेची अद्यावत नोंदणी असल्याचे प्रमाणपत्र

५) शासकीय/ निमशासकीय/ राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र